## हरकत अर्ज

दिनांक : 10/06/2026

प्रति,
मा. निवडणूक अधिकारी सर,
पुणे जिल्हा क्रिकेट संघटना निवडणूक (2026-2029)

अर्जदार : यशवंत शिवराम भुजबळ
पत्ता : 302, शिवप्रताप, 43 मयूर कॉलनी, कोथरूड, पुणे - 411 038
मोबाईल : 90110 70110

महोदय,

सविनय निवेदन असे आहे की आपणा दिनांक 08/06/2026 रोजी प्रसिद्ध केलेल्या दुरुस्त केलेल्या मतदार यादीचे अवलोकन केले असता त्रुटी आणि विसंगती आढळून आली.सदर त्रुटीमुळे निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष राहण्यास बाधा होऊ शकते.या बाबत मी हरकत नोंदवत आहे.

दिनांक 16/10/2021 च्या पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मला देण्यात आलेल्या पत्रानुसार संघटनेच्या दिनांक 13/03/2021 रोजीच्या कार्यकारणी समिती च्या मासिक सभेमधील विषय क्रमांक 3 ठराव नंबर 3 व मासिक सभा दिनांक 12/06/2021 मासिक सभेमधील विषय क्रमांक 1 ठराव नंबर 1 अन्वये सविस्तर चर्चा करून मला आजीव सदस्य करून घेणेबाबत ठराव संमत करण्यात आला होता.त्या नुसार पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या घटने प्रमाणे आजीव सभासदांत्वासाठीची रुपये 250/- फी माझ्याकडून भरून घेण्यात आली होती. असे असूनही माझे नाव आजीव सभासद यादी मध्ये आले नाही.त्यावर आपणास योग्य न्याय द्यावा ही अपेक्षा सोबत सदर आजीव सभासदत्व दिल्याबद्दल चे पत्र आणि त्यासाठीची भरलेल्या फी ची पावती सोबत जोडत आहे. (A) (B)

वरील बाब लक्षात घेऊन दिनांक 08/06/2026 प्रसिध्द करण्यात आलेल्या मतदार यादी पुन्हा पडताळणी करून सुधारित अंतिम यादी प्रसिद्ध करावी ही विनंती. तरी हरकतीची सुनावणी करून त्याबाबत लेखी आदेश द्यावेत.ही हरकत न्यायय आणि निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेच्या हितासाठी सादर करण्यात येत आहे.

धन्यवाद...!!!

आपला विश्वासू

[signature]
यशवंत भुजबळ
90110 70110

Orders:
→ checked PDCA record and found that the contention at (A) & (B) are true.
→ However vide MC meeting dt. 21/2/2023 the resolution is passed cancelling the conferring of Life Membership for various reasons.
→ Since as per PDCA Constitution, MC is the final authority and the question is already settled. E.O has no authority beyond the MC. Thus Rejected.
(ठरावाची प्रत दि. 21/02/2023 सोबत).

Recd. on 10/6/26 at 6.57 PM
[signature]

[signature]
12/06/2026

# दि. २१/०२/२०२३ रोजीचा ठराव ज्यामध्ये श्री भुजबळ यांना दिलेली लाईफ मेंबरशीप रद्द करण्यात आली.

ठि. : तिखे क
४२, बुधवार पेठ,
पुणे - २. फोन नं
Fax : 020-24464905

| | | |
|---|---|---|
| १. सभेचा प्रकार Kind of Meeting: मासिक | ३. सभेची तारीख Date of Meeting: २१/०२/२०२३ | ५. सभेचे स्थळ Place of Meeting: संस्थेचे कार्यालय |
| २. सभेचा क्रमांक S.No. of Meeting: | ४. सभेची वेळ Time of Meeting: सायं. ७.३० वा. | |

६. सभेस कोणी सम्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्दासह) नावे Name & designations of officials & respectable persons present

सभेचे अध्यक्ष. Chairman of Meeting: श्री. विवेक डफळ

THE PUNE DISTRICT CR...

| विषय नं. Subject No. | ठराव नं. Resolution No. | सभेपुढे विचाराकरिता आलेले विषय आणि ठराव Resolutions and subjects Placed before meeting for discussion |
|---|---|---|
| १ | १ | मागील सभेच्या वृत्तांत वाचून कायम करण्यात आला. |
| | | सूचक - सुहास आगलावे अनुमोदक - लहू पाटील |
| २ | २ | संस्थेस आलेल्या पत्रांबाबत घेतलेले निर्णय व माहिती व इतर कागद-पत्रांवर चर्चा करून खालील निर्णय झाले. |
| | A) * | सार्थ माळी, प्रणव रुगडे इ. खेळाडूंनी दिलेली पत्रे वाचण्यात आली. त्यांना सराव, मॅचेस खेळणे यासाठी शाळेचा पत्र आवश्यक होते त्या साठी त्यांना पत्रे देण्याचे सर्वानुमते ठरले. |
| | B) * | आझम स्पोर्ट्स अॅकॅडमीचे पत्र वाचण्यात आली. आझम A व B आणि मुस्लिम बँक यांना फी न भरता मैदानाच्या बदल्यात खेळण्यास मिळावे हे त्यांनी म्हटले त्यानुसार प्रत्येक संघाचे ५ दिवस मैदान घेऊन त्यांना शिंदे लिग मध्ये प्रवेश द्यावा असे सर्वानुमते ठरले. |
| | C) * | दिव्यांग मुलामुलींच्या राज्यस्तरीय स्पर्धा 2023 व AISSMS कॉलेज यांचे पंच मिळावे यासाठीचे पत्र वाचण्यात आले त्यांना स्पर्धेसाठी पंच उपलब्ध करून देण्याचे ठरले. |
| | D) * | U-19 पात्रता फेरी सामन्यांदरम्यान Wisdom C.A व Sahara Cricket Aca. यांनी Overage बाबतीत आक्षेप घेतले. ते पत्र वाचून त्याची माहिती सहसचिव यांनी दिली ती पुढीलप्रमाणे व त्यावर खालील निर्णय झाला. मागील सभेत ठरल्याप्रमाणे Overage आक्षेप आल्या नंतर त्या सर्व खेळाडूंची PDCA कडे सादर झालेली |

**प्रोसिडिंग बुक** सभेच्या कामकाजाच्या वृत्तांताचे पुस्तक

सूचना – सभेस हजर असलेल्या सभासदांची नांवे गरजेप्रमाणे व जरूरीप्रमाणे स्वतंत्र कागद लिहून ती या कामकाजास जोडावीत.

पान नं. – –
Page No.

सभेस हजर असणाऱ्या सभासदांची नांवे – Name of members who were present at the meeting

सुहास आगलावे — लहू पाटील
रमेश तिकोने
उदय बाळ — Aloke Nagaraj
विवेक डफळ — रमेश देडे
नितीन अकोलकर — कैलास येवले
जे.वि. भोसले J.V. Bhosale

| विषय नं. Subject No. | ठराव नं. Resolution No. | सभेपुढे विचाराकरिता आलेले विषय आणि ठराव Resolutions and subjects Placed before meeting for discussion | शेरे व तारखेसह ठरावाची अंमलबजावणी Remarks & /or action taken on the resolution & date |
|---|---|---|---|
| | | कागदपत्रे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन ला पत्र करून पाठवली. त्यावर MCA ने पडताळणी ~~करून~~ करून निर्णय द्यावा असे पत्र सहसचिव यांनी पाठवावे प्रोटेस्ट करणाऱ्या संघाकडून त्यांच्याकडे असलेल्या त्या खेळाडूची पुराव्याची कागदपत्रे मागवावी. संघाकडून दाखल झालेली खेळाडूंची सरकारी कागदपत्रे यांची PDCA च्या कोणताही कार्यकारिणी सभासद नियमाप्रमाणे पडताळणी करू शकत नाही. त्यामुळे सदर खेळाडूने दाखल केलेली कागदपत्रे व प्रोटेस्ट करणाऱ्या संघाने त्या खेळाडूची पुरावे म्हणून दिलेली कागदपत्रे पत्रासोबत MCA ला पाठवावी, असे सर्वानुमते ठरले. | |
| | | सूचक - लहू पाटील अनुमोदक - जयंत भोसले | |
| 3 | 3 | आर्थिक बजेट 2023-24 हे तयार करण्याबाबत संस्थेच्या CA यांच्याशी खजिनदार श्री पुनावाला यांनी बोलून तयार करावे व मा. धर्मादाय आयुक्त येथे जमा करावे त्याची मान्यता घ्यावी असे ठरले. | |
| | | सूचक - सुहास आगलावे अनुमोदक - उदय बाळ | |
| 4 | 4 | पंच कॅटेगरीबाबत चर्चा करण्यात आली. पंच कॅटेगरीमधील संस्थेचे | |

THE PUNE DISTRICT CRICKET ASSOCIATION
(Affiliated to Maharashtra Cricket Association)
Gala No 1 K Block, Nehru Stadium,
Pune-2, Ph 24468407, Fax 020-24464905

Name of the Institution संस्थेचे नाव

# PROCEEDING BOOK

| | | |
|---|---|---|
| सभेचा प्रकार / Type of Meeting: मासिक | ३. सभेची तारीख / Date of Meeting: 27/02/2023 | ५. सभेचे स्थळ / Place of Meeting: PDCA Off. |
| सभेचा क्रमांक / No. of Meeting: | ४. सभेची वेळ / Time of Meeting: | |

६. सभेस कोणी सम्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्यासह) नावे Name & designations of officials & respectable persons present

सभेचे अध्यक्ष. Chairman of Meeting

| विषय नं. Subject No. | ठराव नं. Resolution No. | सभेपुढे विचाराकरिता आलेले विषय आणि ठराव Resolutions and subjects Placed before meeting for discussion |
|---|---|---|
| | | सभासद हे पंचांची मिटींग, पंच परीक्षा यालाही उपस्थित नसतात. कित्येक वर्षे पंच म्हणून कामही पाहत नाहीत. दि. १३/११/२०२२ वार्षिक सर्वसाधारण सभेत ठरविल्याप्रमाणे व दि. ०२/०१/२०२२ ची वार्षिक सर्वसाधारण सभा, यामधील चर्चा याप्रमाणे कार्यवाही करावी असे ठरले. |
| | | सूचक – रमेश तिकोने अनुमोदक – रमेश बेंडे |
| ५ | ५ | आयत्या वेळच्या विषयात खालीलप्रमाणे चर्चा करुन निर्णय घेण्यात आले. |
| | A) * | मयत सभासद यांचे नावे मतदार यादीत दिसत आहेत. ज्या सभासदांच्या संपर्कात अशा सभासदांची फॅमिली असेल त्यांनी मयत सभासदांचे डेथ सर्टिफिकेट व फॅमिलीतील व्यक्तींचा अर्ज नाव कमी करण्याबाबत द्यावा ज्यायोगे पुढील कार्यवाही करता येईल. |
| | | सूचक – सतिश अकोलकर अनुमोदक – विवेक उफळे |
| | B) * | कॉसमॉस बँक व त्यांचे प्रतिनिधी श्री यशवंत भुजबळ यांना पाठविलेल्या पत्रांबाबत चर्चा करण्यात आली. श्री लहू पाटील यांनी कॉसमॉस बँकेने स्वतः जाऊन खुलासा करण्यास सांगितले कारण श्री भुजबळ हे दैनंदिन कामकाजात व मासिक सभेस हजर नसतात. त्यांनी आजपर्यंत खुलासा केला नाही. श्री यशवंत भुजबळ हे 2022 निवडणूकीनंतर जून २०२२ पासून फेब्रुवारी 2023 पर्यंत सप्टेंबर 2022 वगळता मासिक सभेस हजर नाहि व दैनंदिन कामकाजासही उपस्थित नाही. याबाबत ज्यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभा होईल त्यामध्ये सभासदांना कळवावे हे ठरले. त्याचबरोबर दि. १३/०३/२०२१ सभेत त्यांना लाईफमेंबरशिप द्यावी असा ठराव झाला परंतु त्यावेळेसही श्री भुजबळ यांची |

# प्रोसिडिंग बुक सभेच्या कामकाजाच्या वृत्तांताचे पुस्तक

सूचना - सभेस हजर असलेल्या सभासदांची नांवे गरजेप्रमाणे व जरूरीप्रमाणे स्वतंत्र कागद लिहून ती या कामकाजास जोडावीत.



सभेस हजर असणाऱ्या सभासदांची नांवे – Name of members who were present at the meeting

| विषय नं. Subject No. | ठराव नं. Resolution No. | सभेपुढे विचाराकरिता आलेले विषय आणि ठराव Resolutions and subjects Placed before meeting for discussion | शेरे व तारखेसह ठरावाची अंमलबजावणी Remarks & /or action taken on the resolution & date |
|---|---|---|---|
| | | फेब्रु. 2020 ते ऑक्टो 2021 उपस्थित नव्हती तरीही त्यांना का लाईफमेंबरशिप देण्याचा ठराव झाला? असे सहसचिव यांनी विचारले यावर चर्चा होऊन त्यांनी पुन्हा संस्थेसाठी योग्यप्रकारे कामकाज करण्यास सुरुवात केली तर पुढील काळात लाईफमेंबरशिप चा विचार व्हावा तोपर्यंत त्याबाबतचा दि. १३/०३/२०२१ चा ठराव रद्द करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br>सूचक - लहू पाटील अनुमोदक - सुहास आगळावे | |
| | C) * | मागील कार्यकारिणी कमिटीने ०२/०१/२०२२ वा. सर्वसाधारण सभेत कॅशबुक, स्टॉक, पेटीकॅश हे सॉफ्टकॉपीबरोबर मॅन्युअली करावे असे ठरवले परंतु ते झालेले नव्हते यासाठी PDCA चे माजी पदाधिकारी श्री किशोर शौक हे विनामोबदला काम करण्यास तयार आहेत तर याबाबत त्यांची मदत घेण्याचे सर्वानुमते ठरले.<br>सूचक - विवेक डफळ अनुमोदक - जयंत भोसले. | |
| | D) * | किड्स स्पोर्ट्स क्लबच्या ओपन पात्रता फेरीत ब्रिलीयंट ॲकेडमी विरुद्ध प्रोटेस्ट नुसार ब्रिलीयंटने यादी बाहेरील खेळाडू खेळविले त्यामुळे त्यांना अपात्र ठरवले ही माहिती दिली.<br>सूचक जयंत भोसले अनुमोदक - उदय काळे. | |

DIAMOND JUBILEE
2017-18

PDCA
SINCE-1951

THE
PUNE DISTRICT
CRICKET
ASSOCIATION
Affiliated to Maharashtra Cricket Association

( Registered Under Societies Reg. Act 1860, MAH / 1826 / Pune /81 ) ( Registered Under Bombay Public Trust Act, 1950 Reg. No. F. 1901 / Pune )

जा.क्र.पीडीसीए /०७५/२०२१

दिनांक - १६/१०/२०२१

प्रति,

श्री यशवंत शिवराम भुजबळ
"यशोनील" बंगला, ४७/२,
आयडियल कॉलनी, लेन न. ३,
आयडियल ग्राउंड शेजारी,
कोथरुड, पुणे - ४११ ०३८.

**विषय** - आजीव सभासद करुन घेणेबाबत.

**संदर्भ** - आपला अर्ज दिनांक ४ मार्च २०२१

महोदय,

वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपला आजीव सभासद करुन घेणेबाबतचा अर्ज पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेस दिनांक ४ मार्च २०२१ रोजी प्राप्त झाला.

आपण ३ वर्षे खजिनदार पद आणि ६ वर्षे कार्याध्यक्ष पद योग्य पद्धतीने सांभाळले व संघटनेचे कामकाज केले. संघटनेचे नाव उंचावणे, विविध स्पॉन्सर्स आणणे इ. कामे पी.डी.सी.ए. च्या फायद्याच्या दृष्टीने केली आहे. त्यामुळे सर्वानुमते आपणांस आजीव सदस्यत्व द्यावे असे ठरविण्यात आले.

त्याअनुषंगाने कार्यकारिणी समीतीने मासिक सभा दिनांक १३/०३/२०२१, विषय नं. ३, ठराव नं ३ व मासिक सभा दिनांक १२/०६/२०२१ विषय न. १, ठराव नं. १ अन्वये सविस्तर चर्चा करुन आपणांस आजीव सभासद करुन घेणेबाबत ठराव संमत करण्यात आला.

सदर आपण पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या घटनेप्रमाणे आजीव सभासदत्वासाठीची रुपये २५०/- किंवा त्यापेक्षा अधिक फी भरुन द्यावी.

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेसाठी

उदय बाळ / सतिश अकोलकर
सहसचिव

THE PUNE DISTRICT CRICKET ... / /

प्राप्त
१८/१०/२०२१

Gala No. 1, K - Block, Nehru Stadium, Pune 411 002. Phone : 24464905., www.pdcapunecricket.com
E-mail : pdcapune@gmail.com, info@pdcapunecricket.com, secretary@pdcapunecricket.com

1449

DIAMOND JUBILEE 2017-18

PDCA

SINCE 1937

1450

# THE PUNE DISTRICT CRICKET ASSOCIATION

(Affiliated to Maharashtra Cricket Association)

Gala No. 1, K - Block, Nehru Stadium, Pune 411 002.
Phone : 24464905. E-mail : pdcapune@gmail.com

TAX INVOICE / RECEIPT No.: ( GSTIN : 27 AABTT0023B1Z6 ) Date : 18/10/2021.

Received with thanks from Yashwant Shivram Bhusbal ( GST No. )

the sum of Rs. Two hundred ninety five only. On account of

| Sr. No. | Particulars | SAC | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Entry Fees for Anna Jog Invitation | 999651 | |
| 2 | Entry Fees for Sadu Shinde League | 999651 | |
| 3 | Entry Fees for Summer League | 999651 | |
| 4 | Entry Fees for Inter Taluka | 999651 | |
| 5 | Entry Fees for Inter College / School | 999651 | |
| 6 | Entry Fees for Ramesh Bondre Trophy | 999651 | |
| 7 | Affiliation Fees | | |
| 8 | Reg. I - Cards / Transfer | | |
| 9 | ✓ Others Life Membership | | 250.00 |
| 10 | CGST 9% | | 22.50 |
| 11 | SGST 9% | | 22.50 |
| | | Total Rs. | 295/- |

Cash / Cheque Cash

Rs. 295/-

Cheque Subject to Realisation

Hon. Treasurer / Secretary

For

We declare that this invoice shows actual price of the goods and / services described and that all particulars are true and correct. 2. Whether tax payble under revers charge : NO